नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ३० Issue - 30 | वार - बुधवार दि. २४ जून २०२६ Blow- Wednesday Date 24 JUNE 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# महाराष्ट्रातील सात मान्यवरांना 'पद्म' पुरस्कार प्रदान

## देशभरातील ६५ मान्यवरांना पद्म पुरस्कार प्रदान; २ पद्मविभूषण, ७ पद्मभूषण आणि ५६ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशातील महत्वाचे नागरी सन्मान असलेल्या 'पद्म पुरस्कारांचे' वितरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज सन्मानपूर्वक करण्यात आले. महाराष्ट्रातील सात मान्यवरांना त्यांच्या विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय योगदानाबद्दल गौरविण्यात आले.

राष्ट्रपती भवनातील 'गणतंत्र मंडप' येथे आयोजित या समारंभास उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन , प्रधान मंत्री नरेंद्र मोदी , केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांसह अन्य केंद्रीय मंत्री आणि मान्यवर उपस्थित होते.

पद्म पुरस्कार वितरणाच्या दुसऱ्या टप्प्यात देशभरातील ६५ मान्यवरांना पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये २ पद्मविभूषण, ७ पद्मभूषण आणि ५६ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे.

महाराष्ट्रातील मान्यवरांपैकी प्रसिद्ध पार्श्वगायिका अलका याज्ञिक यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. १६ हून अधिक भाषांमध्ये २ हजारांपेक्षा अधिक गीते गाऊन त्यांनी भारतीय संगीत क्षेत्रात मोलाचे योगद-ान दिले आहे.

क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार रोहित शर्मा यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. 'हिटमॅन' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रोहित शर्मा यांनी भारतीय क्रिकेटला अनेक संस्मरणीय विजय मिळवून दिले आ-हेत.

वैद्यकीय क्षेत्रातील योगदानाबद्दल डॉ. आर्मिडा फर्नांडिस यांना पद्मश्री प्रदान करण्यात आला. भारतातील नवजात शिशुवैद्यकशास्त्राच्या अग्रणी तज्ज्ञांपैकी एक असलेल्या डॉ. फर्नांडिस यांनी १९८९ मध्ये मुंबईतील सायन रुग्णालयात आशियातील पहिली मानवी दूध बँक सुरू केली. अकाली आणि दुर्बल नवजात बालकांचे प्राण वाचविण्यात त्यांच्या कार्याचा मोठा वाटा आहे.

वारली आदिवासी परंपरेचे जतन करणारे ८९ वर्षीय तारपावादक भिकल्या लाडक्या धिंडा यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. बांबू आणि सुक्या भोपळ्यापासून तयार होणारे सुमारे १० फूट लांबीचे तारपा वाद्य वाजविण्याच्या त्यांच्या कौशल्याला राष्ट्रीय स्तरावर गौरविण्यात आले.

अभिनेते, पटकथा लेखक, निर्माते आणि दिग्दर्शक आर. माधवन यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. 'अलैपायुथे', 'रहना है तेरे दिल में', 'थ्री इडियट्स', 'तनू वेड्स मनू', 'विक्रम वेधा' यांसारख्या चित्रपटांतील त्यांच्या अभिनयाला प्रेक्षकांनी विशेष पसंती दिली आहे. 'रॉकेट्री : द नंबी इफेक्ट' या चित्रपटाद्वारे त्यांनी दिग्दर्शन क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी केली.

ज्येष्ठ अभिनेते सतीश शाह यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल मरणोत्तर पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. चित्रपट, दूरदर्शन आणि रंगभूमी या तिन्ही माध्यमांमध्ये चार दशकांहून अधिक काळ त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. त्यांच्यावतीने हा पुरस्कार त्यांचे बंधू अरविंद मामनिया यांनी स्वीकारला.

उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल अशोक खाडे यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले. माझगाव डॉकमध्ये नोकरी करत असताना अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण करून त्यांनी १९९२ मध्ये भावांसह 'दास ऑफशोअर' कंपनीची स्थापना केली. आज ही कंपनी देशातील अग्रगण्य अभियांत्रिकी कंपन्यांपैकी एक म्हणून ओळखली जाते.

यंदाच्या पद्म पुरस्कारांसाठी एकूण १३१ पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून त्यामध्ये ५ पद्मविभूषण, १३ पद्मभूषण आणि ११३ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. पुरस्कारार्थींमध्ये १९ महिलांचा समावेश असून १६ मान्यवरांना मरणोत्तर सन्मान जाहीर करण्यात आला आहे.

# महाराष्ट्राचा 'महा एआय' उपक्रम देशात ठरणार अभिनव : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्य शासनाच्या विभागांमधील कामकाज अधिक कार्यक्षम, सुरक्षित आणि लोकाभिमुख करण्यासाठी 'महा एआय' – प्रगत कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी 'महाराष्ट्र हब' हा कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित देशातील पहिलाच अभिनव उपक्रम विकसित करण्यात आला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. लवकरच या उपक्रमाची अंमलबजावणी राज्यातील विविध विभागात होणार असून या माध्यमातून शासकीय कामकाजातील पत्रव्यवहार, टिपण्या, अहवाल तयार करणे, शासकीय कामांचे भाषांतर, दस्तऐवजांचे सारांश तसेच शासकीय ज्ञानभांडारातील माहिती शोधणे यांसारखी कामे अधिक वेगाने आणि अचूकपणे करता येणार असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. विधानभवन येथे महा एआय प्लॅटफॉर्मबाबत बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता,वित्त विभागाचे अपर मुख्य



सचिव विकास चंद्र रस्तोगी, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, प्रधान सचिव नवीन सोना, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, महाआयटीच्या संचालक भुवनेश्वरी एस,राज्य सूचना माहिती अधिकारी व उपमहासंचालक सपना कपूर यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यातील शासकीय यंत्रणेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत प्रशासन अधिक परिणामकारक करण्यासाठी 'महा एआय' महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राने महाराष्ट्रासाठी ही प्रणाली विकसित केली असून ती इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागामार्फत उपलब्ध करून देण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य डेटा सेंटरच्या पायाभूत सुविधांवर कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यामुळे शासकीय माहितीचे सार्वभौमत्व, गोपनीयता व सुरक्षितता सुनिश्चित होणार आहे. सर्व संवेदनशील शासकीय माहिती शासनाच्या स्वतःच्या नियंत्रणाखाली राहणार असून, माहितीची साठवणूक व प्रक्रिया राज्य शासनाच्या सुरक्षित अधोसंरचनेमध्येच केली जाणार आहे.

# विधानसभेत तीन तलाकवरुन गदारोळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : केंद्र सरकारने पारित केलेल्या तीन तलाक कायद्याची महाराष्ट्रात अंमलबाजवणी करण्याबाबतची लक्षवेधी भाजपच्या आमदार देवयानी फरांदे यांनी आज विधासभेत मांडली. यावेळी त्यांनी पाकिस्तानातील कायद्याचा उल्लेख केला. पण याच मुद्द्यावरुन राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार सना मलिक यांनी भूमिका मांडत असताना सभागृहात काहीसा गदारोळ होताना बघायला मिळाला. सना मलिक यांनी भूमिका मांडत असताना कुराणमधील कायद्यांचा उल्लेख केला आणि सभागृहात काही प्रश्न उपस्थित केले. त्यांच्या प्रश्नांना गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी प्रत्युत्तर दिलं. तसेच भाजप आमदार अतुल भातखळकर यांनी देखील हा देश कुराणवर नाही तर संविधानावर चालतो, असं म्हटलं. जो पाकिस्तान आमच्या भारत देशातून वेगळा झाला, त्या पाकिस्तानाचा आम्ही आज विचार केला, त्या ठिकाणी कुणाला बहुविवाह करायचा असेल तर त्याला पहिल्या पत्नीची लेख परवानगी घ्यावी लागते.




**अक्कलकोटच्या विकासाला मोठी संधी**

# बुलेट ट्रेनची दिशा अक्कलकोटकडे; तालुक्यातील विकासाला नवी गती





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : मुंबई–हैदराबाद बुलेट ट्रेन प्रकल्पामुळे अक्कलकोट तालुक्याच्या विकासाला नवे पंख मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. प्रकल्पाच्या प्रस्तावित मार्गामध्ये तालुक्यातील सलगर, अक्कलकोट ग्रामीण, हसापूर, हत्तीकणबस, कोन्हाळी, कर्जाळ, चिक्केहळी, निमगाव आणि ममदाबाद या नऊ गावांतील काही जमिनी संपादनाच्या कक्षेत येण्याची शक्यता आहे. त्यामुळे एकीकडे शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत असली, तरी दुसरीकडे या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे परिसराच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाला मोठी चालना मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

प्राथमिक माहितीनुसार सुमारे १६५ गट क्रमांकांचा समावेश करण्यात आला असून जवळपास ९८० शेतकरी या प्रक्रियेमुळे प्रभावित होऊ शकतात. अंतिम अधिसूचना, संयुक्त मोजणी आणि हरकतींची सुनावणी पूर्ण झाल्यानंतरच बाधित क्षेत्राचे निश्चित चित्र स्पष्ट होणार आहे.

प्रस्तावित मार्गात खासगी शेतीसोबतच शासकीय जागा, वन विभागाच्या जमिनी, ग्राम पंचायत मालमत्ता, रस्ते, नाले, तलाव आणि नदी क्षेत्राचाही काही भाग समाविष्ट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विविध विभागांना जमीन हस्तांतरण प्रक्रियेला सामोरे जावे लागणार आहे.

श्री स्वामी समर्थांच्या पवित्र भूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अक्कलकोटला या प्रकल्पाचा मोठा लाभ होऊ शकतो. देशातील प्रमुख शहरांशी वेगवान संपर्क निर्माण झाल्याने भाविक आणि पर्यटकांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. परिणामी पर्यटन, हॉटेल, लॉजिंग, वाहतूक, व्यापार आणि सेवा क्षेत्राला नवी ऊर्जा मिळेल.

स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होण्यास मदत होणार असून, व्यावसायिक गुंतवणूक आणि जमीनमूल्यांमध्येही वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच औद्योगिक आणि पायाभूत सुविधांच्या विकासालाही गती मिळू शकते.

अंतिम निर्णयाची प्रतीक्षा

सध्या उपलब्ध माहिती प्राथमिक स्वरूपाची असून अंतिम अधिसूचना, संयुक्त मोजणी, हरकतींची सुनावणी आणि नुकसानभरपाई प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच कोणत्या जमिनी संपादित होणार आणि किती क्षेत्र बाधित होणार याचे स्पष्ट चित्र समोर येणार आहे. मात्र, बुलेट ट्रेनसारखा राष्ट्रीय महत्त्वाचा प्रकल्प अक्कलकोटच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

### आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे मत

**बुलेट ट्रेन प्रकल्पामुळे अक्कलकोट आणि सोलापूर ग्रामीण भागातील उद्योग, व्यवसाय आणि पर्यटन क्षेत्राला मोठी चालना मिळेल. यापूर्वी राष्ट्रीय महामार्ग आणि विविध रस्ते विकास प्रकल्पांमुळे या भागाचा विकास झाला आहे. आता बुलेट ट्रेनमुळे तीर्थक्षेत्र अक्कलकोटमध्ये भाविकांची संख्या वाढून स्थानिक अर्थव्यवस्थेला बळ मिळेल. जनतेच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडून येईल, असे मत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.**

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### महा एआय

राज्य शासनाच्या विभागांमधील कामकाज अधिक कार्यक्षम, सुरक्षित आणि लोकाभिमुख करण्यासाठी 'महा एआय' - प्रगत कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी 'महाराष्ट्र हब' हा कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित देशातील पहिलाच अभिनव उपक्रम विकसित करण्यात आला आहे. लवकरच या उपक्रमाची अंमलबजावणी राज्यातील विविध विभागात होणार असून या माध्यमातून शासकीय कामकाजातील पत्रव्यवहार, टिपण्या, अहवाल तयार करणे, शासकीय कामांचे भाषांतर, दस्तऐवजांचे सारांश तसेच शासकीय ज्ञानभांडारातील माहिती शोधणे यांसारखी कामे अधिक वेगाने आणि अचूकपणे करता येणार आहे. राज्यातील शासकीय यंत्रणेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत प्रशासन अधिक परिणामकारक करण्यासाठी 'महा एआय' महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राने महाराष्ट्रासाठी ही प्रणाली विकसित केली असून ती इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागामार्फत उपलब्ध करून देण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य डेटा सेंटरच्या पायाभूत सुविधांवर कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यामुळे शासकीय माहितीचे सार्वभौमत्व, गोपनीयता व सुरक्षितता सुनिश्चित होणार आहे. सर्व संवेदनशील शासकीय माहिती शासनाच्या स्वतःच्या नियंत्रणाखाली राहणार आहे. माहितीची साठवणूक व प्रक्रिया राज्य शासनाच्या सुरक्षित अधोसंरचनेमध्येच केली जाणार आहे. 'महा एआय'' प्रणालीद्वारे अधिकृत पत्रे, ई-मेल, टिपण्या तयार करणे, दस्तऐवजांचे संक्षिप्तीकरण, स्पष्टीकरण व भाषांतर, शासकीय नियम, अधिनियम, शासन निर्णय आणि परिपत्रकांवरील संदर्भाधारित माहिती शोधणे तसेच नैसर्गिक भाषेत अहवाल तयार करणे शक्य होणार आहे. लाभार्थ्यांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने लाभार्थी पडताळणीची सुविधाही उपलब्ध होणार आहे. सदर प्रणालीमध्ये विविध एआय मॉडेल्सची निवड, प्रतिमा व दस्तऐवज अपलोडची सुविधा उपलब्ध आहे. या प्रणालीमध्ये वापरकर्तानिहाय सुरक्षित लॉगिंग, एंड-टू-एंड एन्क्रिप्शन, पदानुसार प्रवेश नियंत्रण यांसारखी सुरक्षा वैशिष्ट्ये समाविष्ट करण्यात आली आहेत, त्यामुळे शासकीय दस्तऐवज आणि माहितीची गोपनीयता अबाधित राहणार आहे. भविष्यात 'महा एआय'चा वापर सर्व शासकीय विभागांमध्ये एकसमान एआय प्लॅटफॉर्म म्हणून करण्यात येणार आहे. तसेच ई-ऑफिस, आरटीआय, ई-एचआरएमएस, आपले सरकार यांसारख्या विविध ई-शासन प्रणालींशी त्याची जोडणी करून मसुदा तयार करणे, भाषांतर, सारांश, ज्ञानसंकलन आणि लाभार्थी पडताळणी यांसारख्या सुविधा अधिक सक्षम करण्यात येतील. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह व राज्य सूचना माहिती अधिकारी व उपमहासंचालक, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र सपना कपूर यांनी महा एआय प्लॅटफॉर्मबाबत सादरीकरण केले.

# राजकारण,संघटना आणि तरुणांचे भविष्य : १८ ते २५ वर्षाचा प्रवास

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

१८ ते २५ वर्षे हा प्रत्येक तरुणाच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा आणि निर्णायक कालखंड असतो. याच वयात व्यक्ती शिक्षण,करिअर, सामाजिक संबंध,नेतृत्वगुण आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या दिशेने वाटचाल करतो. परंतु याच काळात चुकीच्या संगतीमुळे,अविचारी निर्णयांमुळे किंवा दिशाहीनतेमुळे अनेक तरुणांचे आयुष्य भरकटते. काही तरुण सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सकारात्मक योगदान देतात, तर काही व्यसनाधीनता, गुन्हेगारी किंवा इतर गैरप्रकारांच्या विळख्यात अडकतात.

महाविद्यालयीन जीवनात किंवा युवक अवस्थेत अनेक तरुण विविध सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय संघटनांशी जोडले जातात. या माध्यमातून नेतृत्वगुण, संवादकौशल्य, समाजसेवेची भावना आणि संघटन कौशल्य विकसित होऊ शकते. मात्र अंधानुकरण, गटबाजी किंवा आक्रमक विचारसरणीचा प्रभाव पडल्यास त्याचे दुष्परिणामही होऊ शकतात.

मित्रपरिवाराचा प्रभाव, तणाव, उत्सुकता किंवा चुकीची जीवनशैली यांमुळे काही तरुण मद्यपान, तंबाखू, गुटखा, अमली पदार्थ यांसारख्या व्यसनांकडे वळतात. व्यसनामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य बिघडते तसेच शैक्षणिक व व्यावसायिक प्रगतीलाही मोठा फटका बसतो.अनेक युवक स्वयंसेवी संस्था, सामाजिक उपक्रम, पर्यावरण संवर्धन, रक्तदान, आपत्ती व्यवस्थापन अशा क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करतात. अशा तरुणांमुळे समाजात सकारात्मक बदल घडून येतो आणि त्यांचे व्यक्तिमत्त्वही अधिक सक्षम बनते.काही वेळा राजकीय किंवा सामाजिक गटांमधील वाद, मारामाऱ्या, सोशल मीडियावरील गैरवर्तन किंवा बेकायदेशीर कृत्यांमुळे तरुणांवर गुन्हे दाखल होतात.ज्यांचे गंभीर परिणाम त्यांना तात्काळ जाणवत नाही.

गुन्हा दाखल होणे ही केवळ कायदेशीर बाब नसून ती व्यक्तीच्या संपूर्ण भविष्यावर परिणाम करणारी घटना ठरू शकते. शासकीय नोकऱ्या, पोलीस भरती, सैन्य भरती, स्पर्धा परीक्षा, परदेशी शिक्षण किंवा अनेक खाजगी क्षेत्रातील संधी मिळवताना अशा नोंदी अडथळा ठरू शकतात. काही क्षणांच्या चुकीच्या निर्णयाची किंमत अनेक वर्षे मोजावी लागू शकते.

याहूनही अधिक वेदनादायक बाब म्हणजे या परिस्थितीचा परिणाम कुटुंबावर होतो. मुलाच्या भविष्याची स्वप्ने पाहणारे आई-वडील मानसिक तणावाखाली जातात. समाजातील चर्चा, न्यायालयीन प्रक्रिया, आर्थिक खर्च आणि मुलाच्या भवितव्याची चिंता यामुळे संपूर्ण कुटुंब अस्वस्थ होते. ज्यांनी आयुष्यभर मुलासाठी कष्ट घेतले, त्यांनाच त्याच्या चुकीच्या निर्णयांचे परिणाम भोगावे लागतात.

म्हणूनच तरुणांनी कोणत्याही कृतीत सहभागी होण्यापूर्वी तिचे कायदेशीर, सामाजिक आणि व्यावसायिक परिणाम समजून घेणे आवश्यक आहे. क्षणिक आवेशापेक्षा विवेक, जबाबदारी आणि दूरदृष्टी यांना महत्त्व दिल्यास स्वतःचे करिअर आणि कुटुंबाचा सन्मान दोन्ही जपता येऊ शकतात.

१८ ते २५ वर्षे हे आयुष्याला आकार देणारे वय आहे. या काळात घेतलेले निर्णय, निवडलेली संगत आणि स्वीकारलेली मूल्ये भविष्यातील यश-अपयश निश्चित करतात. सामाजिक व राजकीय क्षेत्रात सहभाग घेणे चुकीचे नाही, परंतु त्यासोबत शिक्षण, करिअर, नैतिकता आणि कायद्याचे भान ठेवणे आवश्यक आहे. तरुणांनी क्षणिक आकर्षणापेक्षा दीर्घकालीन उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित केले, तर ते स्वतःचे आणि समाजाचेही भविष्य उज्ज्वल करू शकतील.

**- कु.उर्वशी मनिष संघवी**
**रा.मुर्तिजापूर,जि.अकोला**

# सिताराम सहकारी साखर कारखान्यावर शतकऱ्यांचे ठिय्या आंदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी - पंढरपूर तालुक्यातील खर्डी येथे खाजगी सितराम सहकारी साखर कारखाना सुरू आहे. सदर धुराड्यातून कारखान्याच्या बाहेर पडणारी राख व बग्यास या उपद्रवामुळे परिसरातील अनेक स्थानिक शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे कारखान्याने राखीच्या संदर्भात प्रदूषण मुक्तीची आणलेली मशीन बंद ठेवली असल्याने जवळपास पाच किलोमीटर परिसरात असणारी पिके तसेच घरामधून राखीची लोड दिसून येत आहेत.

त्यामुळे आजूबाजूच्या स्थानिक अबला वृद्ध स्थानिकांना श्वसनाचे विकार जडले असल्याचे दिसून येत आहे कारखान्याने दूषित पाणी प्रक्रिया प्रकल्प न उभारल्याने अनेक विहिरींना व आजूबाजूंना इंधन विहिरीला दूषित पाणीपुरवठा होऊ लागला आहे .

त्यामुळे अनेक आजारांना सामोरे जावे लागले असल्याची तक्रार आजूबाजूने हे ग्रामस्थ करीत आहेत याबाबत कारखाना प्रशासनाशी अनेक वेळा वारंवार पत्र व्यवहार करून देखील तसेच लेखी निवेदन देऊन देखील कोणतीही ठोस उपाययोजना न केल्याने संतप्त ग्रामस्थांनी कारखान्याच्या गेट व समोर ठिय्या आंदोलन सुरू केले आहे.

यावेळी ग्रामपंचायतीने कोणतेही निकष पात्रता पूर्ण न करता वेळोवेळी गाळ परवाने का दिल्या असाच जाब सरपंच, उपसरपंच, संबंधितांनी तेथून काढता पाय घेतल्याचे दिसून आले सदर कारखान्याचे प्रदूषण चाचणी विनायक मंडळांनी देखील घेऊन शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी मागणी ग्रामस्थ मधून दिसून येत आहे.

कोट याबाबत कारखाना प्रमुख श्रीमती राजलक्ष्मी गायकवाड यांनी आंदोलन स्थळी भेट दिली तथापि जुजबी उत्तरे देऊन वेळ मारून नेण्याचा केविलवाणा प्रयत्न केला त्यांच्याशी सविस्तर माहितीसाठी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला त्यांनी संपर्क साधण्यास प्रयत्न केला त्यांनी फोन घेण्यास टाळले,

# खासदार तेजस्वी सूर्या सह पत्नीक श्री विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेतली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी - भाजप यु मोचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा खासदार तेजस्वी सूर्या हे शनिवारी दिनांक २० रोजी पंढरपूर येथे त्यांच्या कुटुंब या समवेत खाजगी दौऱ्यावर आलेली होते. त्यांच्या संगीत विश् राध पत्नी शिवश्री कंद प्रसाद यांची बरेच दिवसाची विठ्ठल चरणी गायन गायन समर्पित सेवा पूर्ण करण्यासाठी आले होते.



शिवश्री स्कंद प्रसाद या तंजावर घराण्याच्या गायिका आहेत. त्यांनी गायलेली आणि अभंग, भजने सोशल मीडियावर खूपच प्रसिद्ध आहे येथील श्री पांडुरंगा समोर त्यांची गायन सेवा शनिवारी समर्पित केली. तुम्ही सभामंडपामध्ये त्यांची गायन सेवा समर्पित करताना गायन सेवा सादर करताना पंडित जितेंद्र अभिषेकी यांनीही गायन दिलेल्या सुखाचे सुख या बंगाली सुरुवात केली.

पंढरपुर येथील इसवी भागातील विसावा मंदिरालाही दिली सह पत्नीक भेट, पंढरपूर येथील इसबावी येथील विसावा मंदिरासह खासदार तेजस्वी सुर्या यांनी सह पत्नीक भेट दिली यावेळी मंदिराचे विश्वस्त नगरसेवक सौरभ थिटे पाटील यांनी त्यांचे स्वागत केले, एवढी रेशमी शेला, हार आणि श्रीफळ देऊन तेजस्वी सूर्यांचा सह पत्नी यथोचित सलमान करण्यात आला त्यानंतर नगरसेवक सौरभ थिटे यांनी विसावा मंदिराचा इतिहास सांगून सविस्तर माहिती दिली.

# दक्षिण सोलापूर: डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या बलिदान दिनानिमित्त वळसंग व आचेगाव येथे अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : भारतीय जनसंघाचे संस्थापक, प्रखर राष्ट्रभक्त डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा बलिदान दिन दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग व आचेगाव येथे श्रद्धापूर्वक पाळण्यात आला. प्रथम राष्ट्र, नंतर पक्ष, शेवटी स्वतः या विचाराला अभिवादन करून दोन्ही ठिकाणी प्रतिमा पूजन व पुष्पांजली अर्पण करण्यात आली.



**वळसंग येथील कार्यक्रम:**

वळसंग येथे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेचे पूजन पंचायत समिती दक्षिण सोलापूरच्या गट नेता व सदस्य बलवान गोतसुर्वे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

या प्रसंगी बसवणाप्पा गणेर, सिद्धू तिपराधी, अनिल बर्वे, मलकप्पा कोडले, महेश खैराटे, धनंजय चौगुले, वीरेश बागलकोटी, मल्लिनाथ ढब्बे, अजय इक्कळगी, सर्वांग कोडले, समर्थ ढब्बे यांच्यासह भाजपा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आचेगाव येथील कार्यक्रम:**

आचेगाव येथेही डॉ. मुखर्जी यांच्या प्रतिमेचे पूजन पंचायत समिती दक्षिण सोलापूरच्या गट नेता व सदस्य यांच्या बलवान गोतसुर्वे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रमेश क्षीरसागर, शिलप्पा घुंगरगाव, नितीन चक्रे,शंकर उपाध्ये,शीलू गुरव,लक्ष्मण खोबण, वसंत खोबण, पारप्पा तीर्थकर, इरप्पा बिराजदार, सिद्धू सुतार,सिद्धू नवगीरे, हरी गुरव, बनसिद्ध शिळेणी, सिद्धू कुंभार, विश्वनाथ चक्रे, अमसिद्ध कांबळे, सातप्पा गुरव व इतर भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

दोन्ही ठिकाणी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या राष्ट्रभक्तीच्या कार्याची माहिती कार्यकर्त्यांना देण्यात आली व त्यांच्या विचारांवर चालण्याचा संकल्प करण्यात आला.

# असल्फा येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



घाटकोपर, केतन भोज - घाटकोपर पश्चिम असल्फा येथे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्म शताब्दी वर्षाचे औचित्य साधून प्रभाग क्रमांक १५९ मधील १० वी च्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ रविवारी दि २१ रोजी भानुशाली वाडी हॉल,खैराणी रोड, असल्फा या ठिकाणी शिवसाई मित्र मंडळ आणि सामाजिक कार्यकर्ते बाळकृष्ण गटे यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. दरम्यान जल्लोष महाराष्ट्राचा या सांस्कृतिक कार्यक्रमाने रंगत आणल्याने मोठ्या उत्साहपुर्ण वातावरणात कार्यक्रम पार पडला. यावेळी प्रभाग क्रमांक १५७ च्या नगरसेविका डॉ. सरिता म्हस्के, सामाजिक कार्यकर्ते नरसीभाई भानुशाली, धरमसीभाई भानुशाली यांसह अनेक मान्यवर, विद्यार्थी, पालक,आणि नागरिक उपस्थित होते. विभागातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या कार्य कर्तुत्वाचा आणि नेत्र दिपक यशाचा यथोचीत सन्मान करून पुढील यशस्वी आणि उत्तुंग वाटचालीसाठी प्रेरणा आणि स्फूर्ती मिळावी या उद्देशाने गेली एकवीस वर्ष सातत्याने या कार्यक्रमाचे आयोजन केले जात असल्याचे आयोजक बाळकृष्ण गटे यांनी सांगितले.यावर्षी प्रथम श्रेणी आणि विशिष्ट प्राविण्य मिळवलेल्या सुमारे ३५० गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय भेटवस्तू आणि सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. विद्या सायन्स अकॅडमी व रोहित कॉमर्स अकॅडमी यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.विभागातील विद्यार्थ्यांनी एमपीएससी आणि युपीएससी परीक्षेची प्रेरणा घ्यावी याकरिता या परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना एक लाख रुपयाचे बक्षीस जाहीर करण्यात आल्याचे आयोजक बाळकृष्ण गटे यांनी यावेळी सांगितले.

# रामनगर सुजाता हॉटेल परिसरात अनधिकृत शेअरिंग रिक्षा व बेशिस्त दुचाकी पार्किंगचा विळखा; नागरिक त्रस्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई, केतन भोज - घाटकोपर पश्चिम येथील रामनगर परिसरात अनधिकृत शेअरिंग रिक्षा आणि बेशिस्त दुचाकी वाहन पार्किंगमुळे वाहतूक कोंडीची गंभीर समस्या निर्माण झाली आहे.आदिनाथ चौक महापालिकेच्या चौकीसमोर तसेच सुजाता हॉटेल परिसरात मोठ्या प्रमाणावर शेअरिंग रिक्षा उभ्या राहत असल्याने रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून स्थानिक नागरिकांना याचा रोज त्रास सहन करावा लागत आहे.स्थानिकांच्या म्हणण्यानुसार,या ठिकाणी रिक्षाचालकांकडून नियमांचे उल्लंघन करून प्रवासी वाहतूक सुरू असते.त्यामुळे रस्त्यावर सतत गर्दी होत असून वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात.याबाबत अनेकदा तक्रारी करूनही संबंधित यंत्रणेकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप स्थानिक सामाजिक कार्यकर्ते मंगेश धावडे यांनी केला आहे.

दरम्यान,रामनगरमधील साईनाथ पुत्रण मार्ग येथेही मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात दुचाकी वाहने बेशिस्तपणे पार्क केली जात आहेत.आधीच अरुंद असलेल्या रस्त्यावर दुचाकी वाहनांची गर्दी वाढल्याने पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.हा परिसर प्रामुख्याने झोपडपट्टीचा असल्याने आपत्कालीन परिस्थितीत समस्या अधिक गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. एखादी दुर्घटना,आग किंवा वैद्यकीय आपत्कालीन प्रसंग उद्भवल्यास अँब्युलन्स अथवा अग्निशामक दलाची गाडी घटनास्थळी वेळेत पोहोचणे कठीण होऊ शकते,अशी भीती स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

नागरिकांनी वाहतूक विभाग,मुंबई पोलीस आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेने संयुक्तपणे या समस्येकडे लक्ष देऊन अनधिकृत शेअरिंग रिक्षांवर तसेच बेशिस्त वाहन पार्किंगवर कारवाई करावी तसेच बेशिस्त पार्किंग रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात,अशी मागणी केली आहे.परिसरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी तातडीने पावले उचलण्याची आवश्यकता नागरिकांकडून व्यक्त होत आहे.



**संबंधित घाटकोपर वाहतूक विभाग आणि महानगरपालिकेने याकडे तातडीने लक्ष देऊन अनधिकृत शेअरिंग रिक्षांवर कारवाई करावी तसेच मुख्य रस्त्यावरील बेशिस्त पार्किंग हटवून नागरिकांना दिलासा द्यावा.नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ही समस्या त्वरित सोडविणे आवश्यक आहे.**
**- मंगेश धावडे, सामाजिक कार्यकर्ते.**





हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# आषाढी वारी २०२६...... जिल्ह्यात पालखी सोहळे, वारकरी येण्यापूर्वीच सर्व सुविधा पूर्ण कराव्यात : जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन

## मागील वर्षी प्रमाणे यावर्षीही आषाढी वारी कालावधीत व्हीआयपी दर्शन बंद राहील तसेच नो व्हेकल झोन चे आदेशही काढले जाणार

**■ वारी कालावधीत भीमा नदीपत्रात चालणाऱ्या सर्व बोटीची तपासणी करावी, बोट चालकांची स्वतंत्र बैठक घ्यावी**

**■ वारी कालावधीत तसेच इतर वेळीही पंढरपूर शहरातील ऑटो चालकांनी कोणत्याही भाविकांकडून जास्तीचे भाडे घेऊन त्रास देऊ नये याची दक्षता आरटीओ नी घ्यावी.**




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : आषाढी शुद्ध एकादशी सोहळा शनिवार दिनांक २५ जुलै २०२६ रोजी होणार आहे. त्यानिमित्त पालखी सोहळे समवेत तसेच श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो वारकरी भाविकांसाठी प्रशासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या सर्व सोयी सुविधा तत्पूर्वीच पूर्ण करून घेण्याची जबाबदारी सर्व संबंधित विभाग प्रमुखाची राहील. तसेच सर्वसामान्य भाविकांचे दर्शन सुलभ व कमी वेळेत होण्यासाठी मागील वर्षी प्रमाणे यावर्षीही व्हीआयपी दर्शन बंदच राहणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी दिली.

आषाढी वारी २०२६ पूर्व तयारी बैठकीत जिल्हाधिकारी कार्तीकेयन मार्गदर्शन करत होते.

यावेळी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, पोलिस उप विभागीय अधिकारी प्रशांत डगळे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सह आयुक्त नगरपालिका आशिष लोकरे, अन्य धान्य पुरवठा अधिकारी ओंकार पडोळे, वीज वितरण चे अधीक्षक अभियंता सुनील माने, प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत सूर्यकांत भुजबळ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता श्याम कुंभार, पंढरपूर नगरपरिषद मुख्याधिकारी महेश रोकडे, गटविकास अधिकारी अमोल जाधव यांच्या सह पंढरपूर व माळशिरस तालुक्यातील सर्व संबंधित अधिकारी ऑनलाइन द्वारे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्तीकेयन म्हणाले की, जिल्ह्यात पालखी सोहळे दाखल होण्यापूर्वी पालखी मार्ग व पालखी तळावर वारकरी भाविकांसाठी सर्व सुविधा उपलब्ध ठेवाव्यात. सार्वजनिक बांधकाम विभागाने पालखी तळाचे मुरमीकरण करण्याबाबत आवश्यक ती तात्काळ कार्यवाही करावी. पालखी तळावरील स्वच्छता, काटेरी झुडपे काढणे, शौचालय दुरुस्ती, पाणीपुरवठा, आरोग्य सुविधा, जंतनाशक फवारणी, हायमास्ट, स्नानगृह, हिरकणी कक्ष आदी सुविधा बाबत संबंधित नगरपालीकेनी कार्यवाही करावी नातेपुते येथील वाढीव पालखी तळाबाबत संबंधित जागा मालकाशी चर्चा करावी व वाढीव पालखीतळाबाबत जागा उपलब्ध करून घ्यावी. यात्रा कालावधीत पालखी तळांवर सुलभ शौचालयाकडून वारकरी भाविकांकडून पैसे घेत असल्याची तक्रारी येत आहेत त्याबाबत दक्षता घेऊन संबंधितांना तात्काळ सूचना देण्यात याव्यात, असेही त्यांनी निर्देशित केले.

तोंडले-बोंडले येथे संत तुकाराम महाराज पालखी सोहळा सुरक्षितरित्या जाण्यासाठी पालखी सोहळा प्रमुखांशी चर्चा करून सुरक्षित मार्गाची व्यवस्था राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने करावी. पालखी महामार्गावरून पिराच्या कुरोली येथील पालखी तळाकडे जाणाऱ्या रस्तादुरुस्तीचे काम तात्काळ करावे. तसेच भंडीशेगाव येथे सोपान काका पालखी तळासाठी पाटबंधारे विभागाची जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्या ठिकाणी असणाऱ्या पाटबंधारे विभागाच्या वापरत नसलेल्या व पाडण्यासाठी परवानगी मिळालेल्या तीन इमारती तात्काळ पाडून सपाटीकरण व मुरमीकरण करावे, पालखी कट्टा तयार करावा, हायमास्ट दिवे आदी व्यवस्थेबाबत तात्काळ कार्यवाही करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी दिल्या.

वाखरी व कॉलेज चौक ते सरगम चौक येथील पुलाचे काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने तात्काळ पूर्ण करावे. तसेच साईड पट्टीचे काम व रस्त्याच्या कडेला पडलेला राडारोडा काढून स्वच्छता करावी. पोलीस प्रशासनाने वॉचटावर साठी प्रस्ताव सादर करावा. ६५ एकर (भक्ती सागर) येथे वारकरी भाविकांना स्वच्छ पिण्याचे पाणी, शौचालय, हायमास्ट ,मुरमीकरण, सुशोभीकरण, सीसीटीव्ही सुविधा तसेच माहिती फलक, पार्किंग नगरपालिका प्रशासनाने उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचना जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी दिल्या.

चंद्रभागा नदी पात्रात होडी चालकांना तसेच जलप्रवासी यांना लाइफ जॅकेटची उपलब्धता करावी. नदीपात्रात रेस्क्यू वाहन, सुरक्षा रक्षक नेमावेत, आसन क्षमतेपेक्षा जास्त जलप्रवासी वाहतूक करू नये. सूर्यास्तानंतर जलप्रवास वाहतूक बंद ठेवावी. तसेच त्या ठिकाणी पाटबंधारे, पोलीस व नगरपालिका विभागांच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. पिण्याच्या पाण्याचे टँकर भरण्याची ठिकाणे निश्चित करावेत टँकर भरण्यासाठी जाणारे रस्ते सुस्थितीत असावी याची दक्षता घ्यावी. आरोग्य विभागाने तज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करावी तसेच मुबलक औषध साठा उपलब्ध ठेवावा.तसेच पाणी स्तोत्राची तपासणी करून घ्यावी, असे ही श्री. कार्तीकेयन यांनी सुचित केले.

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी म्हणाले की यात्रा कालावधीत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक चंद्रभागा स्नानासाठी जातात चंद्रभागा नदीवरील घाटांना मजबूत बॅरिकेटिंग करावे तसेच काही घाटांचे दगड सैल झालेले असल्यामुळे त्याची दुरुस्ती तात्काळ करावे. सीसीटीव्हीची संख्या वाढवावी. वाखरी पालखी तळावर कायमस्वरूपी वॉचटॉवर तयार करावा. पोलीस विभागाच्या वतीने एकूण ३३ वाचतावर उभारले जाणार आहेत असेही त्यांनी सांगितले.

मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी जिल्हा परिषदेला यात्रा कालावधीत पालखी सोहळे वारकरी भाविक यांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ६१.५० कोटीचा निधी उपलब्ध झालेला असून त्या अनुषंगाने २३ ठिकाणी जर्मन हंगर उभारणी केली जाणार असून चरण सेवा उपक्रम, ५०० महिला स्नानगृह, पालखी मुक्कामाच्या ठिकाणी जोड रस्ते, मुरमीकरण, हिरकणी कक्ष, १५ मोबाईल चार्जिंग व्हॅन, तीनशे मोबाईल आरोग्य दूत, पाणी टँकरची व्यवस्था, ५ हजार मोबाईल टॉयलेटची व्यवस्था, तसेच १० हजार वृक्षारोपण करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी पंढरपूर नगर परिषदेच्या वतीने पंढरपूर शहरात तसेच ६५ एकर परिसरात उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सोयीसुविधांची माहिती दिली तर मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी मंदिर, मंदिर परिसर तसेच वाळवंटात मंदिर समितीच्या वतीने भाविकांसाठी सुलभ व जलद दर्शन व्यवस्था तसेच आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यात येत असलेल्याबातची माहिती दिली.

# पंढरपूर आषाढी वारी २०२६, नियमबाह्य ऑटो रिक्षा व मनमानी भाडे आकारणीवर कडक कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी - आषाढी एकादशी महासोहळा २०२० या पार्श्वभूमी पंढरपूर ते शेत्र येणाऱ्या भाविक व वारकऱ्यांची वाहतूक व्यवस्था सुरक्षित, सुलभ, आणि सुव्यवस्थित ठेवण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. वारीच्या काळात भाविकांची लूट रोखणे तसेच वाहतूक कोंडी टाळणे यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय सोलापूर यांनी खडक उपाय योजना हाती घेतले आहेत.



पंढरपूर शहर व परिसरात धावणाऱ्या ऑटोरिक्षांवर संयुक्त धडक मोहीम राबविण्यात येत असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वर तात्काळ कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

विनापरवाना वाहतुकीवर कारवाई: वैद्य चालक परवाना परमिट नसताना प्रवासी वाहतूक करणारी रिक्षा चालकांवर मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करून संबंधित वाणी जप्त करण्यात येतील.

मनमानी भाडे आकारणी सहन केली जाणार नाही वारीदरम्यान प्रशासनाने निश्चित केलेल्या दरापेक्षा जास्त भाडे आकारणाऱ्या किंवा मनमदी पद्धतीने पैसे वसूल करणाऱ्या रिक्षा चालकाचे परवाने तात्काळ निलंबित करण्यात येथील.

निमबाह्य व ज्यादा प्रवासी वाहतुकीवर दंडात्मक कारवाई क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहतूक करून नागरिकांच्या सुरक्षेची खेळ करणाऱ्या वाहनचालकावर दंडात्मक कारवाई केली जाईल.

**महत्वाची सूचना,**

प्रशासनाने सर्व रिक्षा चालकांना वाहनांचे फिटनेस प्रमाणपत्र व विमा (इन्शुरन्स) आणि चालक परवाना सोबत बाळगणे बंधनकारक केले आहे. तसेच निश्चित केलेली भाडेपत्रक, व (ट्रॅफिक कार्ड) प्रवाशांना स्पष्ट दिसेल अशा ठिकाणी लावने.

**प्रवासी व वारकऱ्यांसाठी आव्हान:**

प्रवासी व वारकऱ्यांनी कोणतीही रिक्षा चालकांकडून ज्यादा भाड्यांची मागणी झाल्यास किंवा गैरवर्तन झाल्यास तात्काळ परिवहन विभागाच्या मदत कक्षाशी (०२१७-२३०३०९९) या नंबर वर संपर्क साधावा असे आव्हान करण्यात आले आहे.

भाविकांचा प्रवास सुरक्षित व सुखकर ओवा यासाठी सर्व रिक्षा चालकांनी प्रशासनास सहकार्य करावे अन्यथा कोणतीही गयी न करता परवाना रद्द करण्यात कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

ही माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

# मनसे नेते दिलीप धोत्रे पुन्हा जनसेवेसाठी मैदानात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : बापूंच्या विकास कामाची पाहणी जनसेवा नवीन सुरुवात, पुणे महामार्गावरील झालेल्या भीषण अपघातात गंभीर जखमी झाल्यानंतर उपचार घेऊन पूर्णपणे सावरलेली महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची माहिती दिली होती सक्रिय झाल्या आहेत. रविवारी त्यांनी नगरसेविका माधुरीताई धोत्रे यांच्या विकास निधीतून मंजूर करण्यात आलेल्या विविध विकास कामांची प्रत्यक्ष पाहणी करत जनतेसाठी असलेली आपली बांधिलकी अधोरेखित केली.



प्रभाग क्रमांक १७ मधील नागरिकांना दिलेल्या विकासाची आश्वासन पूर्ण करण्याच्या दृष्टीने सुरू असलेल्या कामाचा आढावा घेतला व दिलीप धोत्रे यांनी जगदंबा वसाहतीतील ड्रेनेज लाईनच्या पाईपलाईनचे काम तसेच परिसरात उभारण्यात येत असलेल्या व्यायाम शाळेच्या कामाची पाहणी केली संबंधित कामे दर्जेदार व वेळेत पूर्ण होईल अशा सूचनाही त्यांनी संबंधितांना दया व गोरगरीब व सर्वसामान्य जनतेचे आधारवड म्हणून ओळख असलेल्या थीफ धोत्रे यांच्या अपघाताची बातमी समोर आल्यानंतर त्यांच्या प्रकृतीबाबत सर्वसामान्य नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत होती विविध स्तरातून त्यांच्या प्रकृतीसाठी प्रार्थना करण्यात आल्या होत्या जिंतीच्या शुभेच्छा आणि आशीर्वादामुळे ते सुखरूप बरे झाले जी भावना त्यांच्या समर्थकांनी व्यक्त करण्यात आली होती त्यानंतर दिलीप धोत्री पुन्हा एकदा सक्रिय होत असल्याची विकास कामाच्या पाहणीतून जयंतीच्या प्रश्नाकडे लक्ष देण्यास सुरुवात केली आहे. त्यांच्या या पूर्व आगमनामुळे करते आणि नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण असून आगामी काळात विकासाच्या विकास गती मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# विद्यार्थ्यांचा व पालकांचा काकासाहेब नगर महाविद्यालयाच्या वतीने सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : काकासाहेब नगर महाविद्यालय, येथील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये विविध नामांकित कंपन्यांमध्ये नोकरी मिळविलेल्या तसेच भारतीय सैन्य दलात निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा महाविद्यालयाचे वतीने प्राचार्य डॉ. अतुल गवारे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ, शाल व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे. महाविद्यालयातील २७ विद्यार्थ्यांची विविध नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. तसेच ९ विद्यार्थ्यांनी भारतीय सैन्य दलातील विविध पदांवर निवड मिळवून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. ही महाविद्यालयासाठी अभिमानाची गोष्ट आहे. प्राचार्य डॉ. अतुल गवारे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच त्यांच्या रोजगारक्षमतेसाठी सातत्याने प्रयत्नशील असून भविष्यातही अधिकाधिक विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येतील. विद्यार्थी व पालकांनी महाविद्यालयाचे प्राचार्य, व ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे आभार मानले...

यावेळी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. अरुण ठोके, प्रा. मिलिंद पवार, प्रा. शीतल जगताप, प्रा. वैशाली पगार हे उपस्थित होते.

## महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये अत्यंत नाटयमयरित्या फोडा फोडीचे राजकारण

# नळदुर्ग येथे जोडे मारो आंदोलनाने केला ओमराजे यांचा तिव्र शब्दात निषेध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : होय नाही करत, विचार करून सांगतो म्हणत अखेर शिव सेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) चे धाराशिव लोकसभा मतदार संघांचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी ज्या मतदारांनी प्रचंड मताधिक्याने निवडून दिले त्या मतदारांच्या भावनेचा विचार न करता स्वतःच्या स्वार्थापोटी प्रामाणिक शिवसैनिकाशी गद्दारी करत नुकतच शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला.त्या पक्ष प्रवेशाचा नळदुर्ग ता. तुळजापूर येथील उबाठा शिवसैनिकांनी तीव्र शब्दात निषेधकरून येथील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) शहर शाखेच्यावतीने उबाठा शिव सेने चे





एकनिष्ठ नेतृत्व कमलाकर काका चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली तर शिवसेना (उबाठा)सोलापूर जिल्हा अध्यक्ष अजय दासरी यांच्या प्रमुख उपस्थितीत जोडे मारो आंदोलन करून खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या निर्णयाचा तिव्र शब्दात जाहीर निषेध करत खासदारकीच्या राजीनाम्याची मागणी केली.

महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये अत्यंत नाटयमयरित्या फोडा फोडीचे राजकारण होत आहे. आता पर्यंत शिवसेनाप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली एकनिष्ठ असलेले महाराष्ट्रातील सहा खासदार अचानकपणे उद्धव ठाकरे यांच्या पाठीत खंजीर खुपसून शिवसेना एकनाथ शिंदे गटात प्रवेश केला.त्यात धाराशिव लोकसभा मतदारसंघातील खासदार ओमराजे निंबाळकर यांचाही समावेश आहे. इकडची दुनिया तिकडे होईल पण खासदार ओमराजे निंबाळकर हे उद्धव ठाकरेसी गद्दारी करणार नाहीत असा ठाम आत्मविश्वास असलेल्या धाराशिव जिल्ह्यातील शिवसैनिकांचा विश्वासघात करत लाखो मतांनी विजयी करणाऱ्या मतदाराच्या भावनेचा विचार न करता स्वतःच्या स्वार्थक पोटी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्याकडे पाठ फिरवून शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणारे ओमराजे निंबाळकर यांचा नळदुर्ग शहर शिव सेने च्या वतीने त्यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याची शहरातील मुख्य रस्त्याने दिंड काढून नळदुर्ग अक्कलकोट राष्ट्रीय महामार्गावर बसस्थानकाजवळ जाहीर निषेध सभा घेऊन जोडे मारो आंदोलन करून या गद्दार ओम्याचे करायचं काय खाली मुंडक वरती पाय अशा निषेधार्थ घोषणा देत त्यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला जोडे मारून जाहीर निषेध करून उपस्थित शिवसैनिकांनी ओमराजे निंबाळकर यांच्या खासदारकीचा राजीनामा मागितला.या आंदोलनाचे सूत्रसंचालन शिवसेना नळदुर्ग शहर शाखा प्रमुख शाखाप्रमुख संतोष पुदले यांनी केले याप्रसंगी शिवसेनेचे जेष्ठ नेते कमलाकर काका चव्हाण, सोलापूर जिल्हा अध्यक्ष अजय दासरी,तुळजापूर तालुका उपप्रमुख सरदार सिंग ठाकूर, शिवसेनेचे नेते प्रदीप जोशी, जि.प.सदस्य. डॉ.जितेंद कानडे, बाळकृष्ण पाटील आदीची ओमराजे निबांळकर यांच्या निषेधार्थ कडवट शब्दात भाषणे झाली. यावेळी शिवसैनिक मेजर राजेंद्र जाधव सह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# यांची जहागिरी संपली, सोलापूरच्या जनतेने उत्तर दिलं

## आमदार सचिन कल्याणशेट्टींचे मोहितेंना उत्तर, म्हेत्रेंबद्दल मोठे वक्तव्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर विधान परिषदेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीच्या राजेंद्र राऊत यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वसंत नाना देशमुख यांना धूळ चारली. या या निवडणुकीत मोहिते पाटील विरुद्ध पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आमदार सचिन कल्याणशेट्टी असाच सामना रंगल्याचे पाहायला मिळाले.





एकमेकांवर वैयक्तिक पातळीवर टीका सुद्धा झाली. उमेदवार वसंतराव देशमुख यांच्या वतीने खासदार धर्यशील मोहिते पाटील यांनी आव्हान दिले होते. निवडणूक लागलेल्या दिवशीच आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी मोहिते पाटलांचे नाव न घेता ज्यांच्यामुळे ही निवडणूक लागली त्यांना आम्ही धडा शिकवू अशी भाषा केली होती.

त्यानंतर मतदानाच्या दिवशी प्रतिक्रिया देताना सचिन कल्याणशेट्टी यांनी विरोधकांवर अदृश्य होण्याची वेळ आली त्यांचा इगो या निवडणुकीनंतर संपून जाईल असे मोहिते पाटलांना आव्हान दिले होते.

यावर आधारित मोहिते पाटील यांनी आमदार कल्याणशेट्टी यांच्यावर बोचरी टीका करताना ते राजकारणात लहान आहेत, लहान मुलांच्या तोंडून असे शब्द निघून जातात अशा शब्दात तोंड सुख घेतले होते.

दरम्यान राजेंद्र राऊत यांचा विजय झाल्यानंतर विजय जल्लोष करताना आमदार कल्याणशेट्टी यांनी प्रतिक्रिया दिली विरोधकांची जहागिरी आता संपली आहे, त्यांच्या इगो ला या जनतेने जागा दाखवून दिले आहे. हे लोक अजूनही सरंजामशाही, वतनदार, जहागिरशाही अन् मालकीच्या भूमिकेत आहेत, यांना वाटले की मालकी आमच्या आहे पण या जिल्ह्यातील जनतेने त्यांची जागा दाखवली आता कुठलीही जागीरदारी राहिलेली नाही ही लोकशाही आहे.

दरम्यान अक्कलकोट तालुक्यातील म्हेत्रे -कल्याणशेट्टी नवे पर्व सुरू होणार का? यावर त्यांनी कल्याणशेट्टी आणि म्हेत्रे यांचे पर्व सुरू होईल का माहित नाही, पण हे भारतीय जनता पार्टी आणि महायुतीचे यश आहे माझा पक्ष आणि माझा नेता जिथे जिथे महायुती सोबत राहायला सांगतील, तिथे आम्ही सोबत राहू, जे जे प्रामाणिक असतील त्यांना सोबत घेऊन जाऊ अशी प्रतिक्रिया दिली.

# राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त शुक्रवारी मंगळवेढ्यात ३४ वी पाणी संघर्ष परिषद



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मंगळवेढा : कृष्णा खोऱ्यातील दुष्काळग्रस्त भागातील पाणी प्रश्नावर चर्चा, नियोजन आणि जनजागृती करण्याच्या उद्देशाने शुक्रवार, दिनांक २६ जून २०२६ रोजी दुपारी १ वाजता जोशी मंगल कार्यालय, बायपास रोड, मंगळवेढा येथे ३४ वी पाणी संघर्ष परिषद आयोजित करण्यात आली आहे. राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या परिषदेत विशेषतः सांगोले तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी केले आहे.

**तालुक्यातील शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे: आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख**

परिषदेत कृष्णा खोऱ्यातील दुष्काळी तालुक्यांच्या पाणी प्रश्नावर सखोल चर्चा होणार असून, विविध सिंचन योजना, पाणी साठवणूक, जलव्यवस्थापन, जलहक्क आणि शेतीसाठी पाणी उपलब्धतेसंदर्भातील मुद्द्यांवर विचारमंथन होणार आहे. तसेच पाणी वाटपातील समता, जलसंधारण आणि प्रलंबित प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्याबाबत भूमिका मांडली जाणार आहे.

यावेळी निमंत्रक वैभव नागनाथ नायकवडी यांच्यासह पाणी परिषदेचे अध्यक्षस्थानी प्रा. शिवाजीराव काळुंगे उपस्थित राहणार आहेत . त्याचप्रमाणे प्रमुख उपस्थिती आ. विक्रमदादा सावंत, आ. रोहित आर. आर. पाटील, आ. राजेंद्र अण्णा देशमुख यांच्यासह

मा.प्रा.डॉ. बाबुराव गुरव, मा.प्रा.आर.एस चोपडे, प्रा. बाळासाहेब नायकवडी, श्री. विश्वंभर बाबर, अॅड. सुभाष पाटील, अॅड. सरफराज बागवान, अॅड. भारत पवार,प्रा.दत्ताजीराव जाधव,. सी.पी. गायकवाड, श्री.व्ही. एन. देशमुख, अॅड. बिराप्पा जाधव, श्री. तुकाराम बाबा महाराज यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

टेंभू, म्हैसाळ, ताकारी इ. प्रकल्पाचे पाणी तलाव, नदी, ओढ्यांमध्ये आले आहे. चळवळीच्या पायाभूत घोषणेनुसार प्रत्येकाच्या शेतात पाणी पोहोचणे आवश्यक आहे.

त्यासाठी मुख्य कालव्यासह पोट कालव्याची कामे पूर्ण होणे आवश्यक आहे. तसेच कार्यक्षेत्रातील तलाव, पाझर तलाव, गाव तलाव व कोल्हापूर पद्धतीचे बंधारे भरून देणे आवश्यक आहे. यासाठी भरीव निधीची तरतूद होणे गरजेचे आहे. आपण शांत राहून सरकार निधीची तरतूद करेल असे वाटत नाही आपल्या जनसामर्थ्यांचा रेटा उभा करणे गरजेचे आहे.

१२ वर्षांपूर्वी केंद्रातील व राज्यातील सरकार बदललेली आहेत. राज्य व केंद्रातील सरकारची एकूण चाल बघितली असता अद्यापही शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या दुष्काळी योजनांची पूर्तता याबाबत ठोस पावले उचललेली दिसत नाहीत. जनतेच्या रेट्यामुळे केंद्र व राज्य सरकारने १२ वर्षाच्या काळामध्ये सांगोला शाखा प्रकल्प, टेंभू म्हैसाळ व ताकारी प्रकल्पांसह राज्यातील अपूर्ण पाटबंधारे प्रकल्पांपैकी २६ अपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्याचा निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्रासह देशभर दुष्काळ. कर्जबाजारीपणा, नैसर्गिक आपत्ती यासारख्या संकटांना घाबरुन इथला शेतकरी आत्महत्या करत आहे. शेतकऱ्याला आत्महत्या करावी लागणे ही राज्यकर्त्यांच्या स्वातंत्र्योत्तर ७८ वर्षातील शेती व पाणी विषयाच्या चुकीच्या धोरणामुळे उद्भवलेली समस्या आहे. दुष्काळाचे कायमस्वरुपी निर्मूलन करायचा मार्ग आपणास पद्मभूषण क्रांतीवीर डॉ. नागनाथअण्णा नायकवडी व आ.भाई डॉ. गणपतराव देशमुख यांनी दाखवून दिलेला आहे. त्या मार्गाने पुढे जाऊन उर्वरित समान पाणी वाटपाच्या सर्व कामांच्या पूर्ततेसाठी भरीव निधीची तरतूद करण्यात राज्यकर्त्यांना करायला भाग पाडण्यासाठी व राज्यातील सर्व शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊन त्यांचे उतारे कोरे करण्यासाठी, शेतकऱ्यांच्या शेती मालाला व दुधाला खर्चावर आधारित हमीभाव मिळवण्यासाठी व स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी अमलात आणण्यासाठी सांगोला तालुक्यातील शेतकरी बांधवांनी बंधू-भगिनींनी हजारोंच्या संख्येने ३४ व्या पाणी परिषदेस उपस्थित राहावे, असे आवाहन आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी केले आहे.

# पांचपीर ट्रस्ट आयोजित सार्थक साहित्य प्रकाशनाच्या 'काव्यमुदिता' काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई प्रतिनिधी - पांचपीर ट्रस्ट कार्यक्षेत्र भारत यांच्या वतीने आयोजित सार्थक साहित्य प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या कवी अशोक भवार यांच्या 'काव्यमुदिता' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत प्रा. शुक्राचार्य गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. या पुस्तक प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी साहित्यिक व विचारवंत नवनाथ रणखांबे होते. यावेळी सार्थक साहित्य प्रकाशनाच्या संचालिका प्रा. आशा नवनाथ रणखांबे, पांचपीर ट्रस्टचे संचालक तथा साहित्यिक शाम परशुराम बैसाणे आणि बौद्ध विकास मंडळ पवईचे अध्यक्ष भाऊ पंडागळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. आणि मानवतावादी निमंत्रित कवी संमेलन ज्येष्ठ कवी बबन सरोदे यांच्या अध्यक्षतेखाली चंद्रमणी बुद्धविहार, आयआयटी मेनगेट, पवई येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

यावेळी प्रकाशिका प्रा. आशा रणखांबे यावेळी बोलताना म्हणाल्या, लेखकाच्या विचारांना दर्जेदार पुस्तकाचे रूप देणे ही सार्थक साहित्य प्रकाशनाची बांधिलकी आहे. 'ना नफा, ना तोटा' या तत्त्वावर कार्य करत आम्ही साहित्यिकांना गुणवत्तापूर्ण प्रकाशनाची संधी उपलब्ध करून देत आहोत. त्यामुळे नवोदित आणि ज्येष्ठ साहित्यिकांनी याचा लाभ घ्यावा. तर शाम बैसाणे यावेळी बोलताना म्हणाले, पांचपीर ट्रस्टमार्फत नवोदित आणि ज्येष्ठ कवींच्या पुस्तक प्रकाशनास आम्ही मदत करत असून साहित्यिकांना विचारमंच उपलब्ध करून देत आहोत त्याचा लाभ घ्यावा.

पुस्तक प्रकाशन सोहळ्यानंतर आयोजित मानवतावादी निमंत्रित कवी संमेलन जेष्ठ कवी बबन सरोदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. यावेळी मानवतावादी काव्यमंच्यावर नवनाथ रणखांबे, शाम बैसाणे, अशोक भवार, संतोष नरवाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्ष आणि प्रमुख मान्यवरांसह अनंत धनसरे, धनंजय सरोदे, संदेश कर्डक, के. पुरुषोत्तम, प्रतीक कांबळे, सुरेखा गायकवाड, डॉ. सुशील बैसाणे, विकास भंडारे, वसंत हिरे, बाळासाहेब जोंधळे, वसंत वाघमारे, सुरेश घोडगे, जयलाभ धन पैठने, विश्वास कांबळे, महेश सावंत आदी. कवींनी आपल्या कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन सुरेखा गायकवाड यांनी

# कासार कोळवण गावचे उपसरपंच यांना पितृशोक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई, केतन भोज - शाहीर स्व.धोंडू रामा तोरस्कर..जन्म १९३२, मृत्यु २२/६/२०२६ (सकाळी..८.५५ वा.) कासार कोळवण गावी झाला असून अंत्यविधी पार पडलेला आहे तरी त्यांची माती सावरणे कार्यक्रम रविवार दिनांक २८/६/२०२६ रोजी सकाळी ८ वाजता पार पडणार आहे. त्याजबरोबर त्यांचे उत्तरकार्य बारावे , तेरावे विधी हा कार्यक्रम शुक्रवार दिनांक ३/७/२०२६ रोजी त्यांच्या कासार कोळवण येथे निवासस्थानी करण्यात येणार आहे नात्या गोत्यातील व भावकीतील मंडळी व ग्रामस्थ यांनी नोंद घ्यावी. श्री शिवशक्ती उत्कर्ष मंडळ, कांडकरी विकास मंडळ, संघर्ष विकास समिती, नवतरुण मित्र मंडळ, क्रांती क्रिकेट संघ , सांबा कांडकरी क्रिकेट संघ, अश्या गावातील अनेक मंडळे व अनेक राजकीय पुढारी व शिक्षक वृंद अनेक मान्यवर यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

# डॉ. दत्तात्रय गायकवाड यांना समता पुरस्कार प्रदान व पुस्तक प्रकाशन संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : ज्येष्ठ आंबेडकरी लेखक व अभ्यासक डॉ. दत्तात्रय गायकवाड लिखित ' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वैचारिक अन्वयार्थ' या समीक्षा फाउंडेशन प्रकाशित पुस्तकाचे प्रकाशन जेष्ठ जलतज्ञ व पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष डॉ. दत्ता देशकर, एडवोकेट धनंजय सिंहासने, एमआयटीच्या प्रा. नीलम पंडित आणि फलटन मुधोजी महाविद्यालयाचे डॉ. प्रा. नवनाथ रासकर व इतर मान्यवरांचे हस्ते प्रकाशन संपन्न झाले.

डॉ. गायकवाड यांचे हे तिसावे प्रकाशन होते. तसेच कराड वैभव चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने एडवोकेट धनंजय सिंहासने व सचिव नवनाथ शिंदे यांनी डॉक्टर दत्तात्रय गायकवाड यांना समाज परिवर्तन क्षेत्रात समता स्वातंत्र्य बंधुता आणि सामाजिक न्यायाचा पुरस्कार करणारे साहित्य प्रसिद्ध केल्याबद्दल 'समता पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला.

एडवोकेट सिंहासने आणि डॉ. दत्ता देशकर व इतर मान्यांयवरांचे हस्ते सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, फुलेफेटा आणि उपरणे देऊन सन्मानित करण्यात आले.



यावेळी बुलढाण्याचे साहित्यिक सुरेश साबळे, नांदेडचे बाबुराव पाईक, प्रा. डॉ. म. ना. गायकवाड, केंद्रीय जल आणि विद्युत संशोधन केंद्राचे सेवानिवृत्त ग्रंथपाल बी वाय जोशी, एम के पवार, हृदयप्रकाश, हर्षानंद सोनवणे, बुद्धाचार्य व केंद्रीय शिक्षक राजेंद्र सोनवणे, कवी अनंतराव जाधव तसेच सामाजिक कार्यकर्ते विजय पंडित, डॉ. मुकुंद सोनकांबळे, हजर होते.

डॉ गायकवाड यांच्या ६६ व्या वाढदिवसानिमित्त समीक्षा फाउंडेशन आयोजित आंबेडकरवादी कवी संमेलनात हर्षानंद सोनवणे कवी अनंतराव जाधव, एम के पवार, आंबेडकवादी कवी सुनील गायकवाड आणि नांदेडचे बाबुराव पाईक यांनी क्रांतिकारी कविता सादर केल्या.

डॉ. दत्ता देशकर आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, मानवी जीवनात पाण्याचे महत्व अनन्यसाधारण आहे. पाणी समतोल व विवेकाने वापरावे. पाणीसाठा समुद्रात अधिक असला तरी पिण्याचे पाणी व औद्योगिक वापरासाठी वापरण्यात येणारे पाणी यासाठी आपल्या पाण्याचे नियोजन आपण नीटपणे केले पाहिजे. म्हणून त्यांनी सिंगापूर व इतर देशातील पाणी उपलब्धतेचा आढावा घेतला. यावेळी प्राध्यापक पंडित, डॉ. नवनाथ रासकर, सुरेश साबळे, बाबुराव पाईकराव, बी वाय जोशी, हर्षानंद सोनवणे, डॉ. म. ना. गायकवाड यांची मनोगतपर भाषणे झाली.

डॉ. दत्तात्रय गायकवाड यांनी आपल्या सत्काराचे उत्तर भाषणात, त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण कसे पार पडले यावर आपला संघर्ष सांगितला. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आदर्श मानून, ज्ञान म्हणजे प्रकाश. त्यांनी प्रकाशाच्या दिशेने वाटचाल केली. प्रकाश किरणे अंगावर आली. झाडाचे अंकुर जसे साल फोडून बाहेर येते तशा वेदना सहन केल्या. नवनिर्मिती करताना वेदना होतात.

व्यासंग, जिद्द, प्रामाणिकपणा, सातत्य व अभ्यासूवृत्ती असल्यानेच ते परिस्थितीशी संघर्ष करत जीवनात वाटचाल केली. म्हणूनच ते आत्तापर्यंत सुमारे ३० ग्रंथांचे लेखन करू शकले हे त्यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बौद्धाचार्य निलेश गायकवाड यांनी केले.

**आ. समाधान आवताडे यांच्या मागणीची मुख्यमंत्र्यांकडून दखल**

**वीज समस्येवर लवकरच दिलासा मिळण्याची शक्यता**

# पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघ तसेच प्रामुख्याने भीमा नदीकाठच्या भागातील वीज समस्येवर तातडीने उपाययोजना करा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर / प्रतिनिधी - पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघ व प्रामुख्याने भीमा नदीकाठच्या भागात घरगुती, शेती पंप आणि उद्योगांसाठी होत असलेल्या अनियमित वीजपुरवठ्यामुळे नागरिक, शेतकरी आणि व्यापारी वर्गामध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून या प्रश्नावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आमदार समाधान आवताडे यांनी पत्राद्वारे केली आहे.

या मागणीची दखल घेत मुख्यमंत्र्यांनी संबंधित विभागाला तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश दिल्याची माहिती समोर आली आहे.

सध्या महाराष्ट्र विधान मंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरु असून यामध्ये आमदार सुभाष देशमुख यांनी विचारलेल्या प्रश्नावर तालिका अध्यक्ष आमदार समाधान आवताडे यांनी माझ्याही मतदारसंघात व भीमा नदीकाठच्या भागात विजेची समस्या भेडसावत असल्याने ऊर्जा विभागाला तसे आदेश दिले असल्याचे सांगितले आहे. यामुळे लवकरच ग्रामीण भागातील विजेची समस्या दूर होऊन शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

> **सध्या महाराष्ट्र विधान मंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरु असून यामध्ये आमदार सुभाष देशमुख यांनी विचारलेल्या प्रश्नावर तालिका अध्यक्ष म्हणून उपस्थित असलेले आमदार समाधान आवताडे यांनी माझ्याही मतदारसंघात विजेची समस्या भेडसावत असल्याने मुख्यमंत्र्यांकडे तशी मागणी केली असून ऊर्जा विभागाला आदेश दिले असल्याचे सांगितले आहे. यामुळे लवकरच ग्रामीण भागातील विजेची समस्या दूर होऊन शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.**

पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार आवताडे यांनी मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या पत्रात पंढरपूर आणि मंगळवेढा तालुक्यातील वीजपुरवठ्याच्या गंभीर समस्येकडे लक्ष वेधले आहे. महावितरणच्या नियमानुसार शेती पंपांसाठी सलग आठ तास वीज, भगीरथ योजनेअंतर्गत घरगुती वापरासाठी नियमित सिंगल फेज वीज आणि उद्योगांसाठी अखंडित वीजपुरवठा अपेक्षित असताना प्रत्यक्षात अनेक भागांत शेतकऱ्यांना चार तासही पुरेशी वीज मिळत नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

सौरऊर्जेमुळे दिवसा आठ तास वीज दिली जात असल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात असला, तरी प्रत्यक्षात अनेक भागात कमी दाबाने आणि खंडित स्वरूपात वीजपुरवठा होत असल्याने शेतीची कामे प्रभावित होत आहेत. तसेच ग्रामीण भागात घरगुती वापरासाठी सकाळी आणि सायंकाळी आवश्यक असलेली सिंगल फेज वीजही नियमित मिळत नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

उन्हाळ्याच्या तीव्र उष्णतेमुळे नागरिक त्रस्त असताना रात्रीच्या वेळेस वीजपुरवठा खंडित होत असल्याने गैरसोयी वाढल्या असून चोरीच्या घटनांमध्येही वाढ झाल्याची बाब आवताडे यांनी पत्रात नमूद केली आहे. या पार्श्वभूमीवर अनेक गावांमध्ये नागरिकांकडून मोर्चे आणि आंदोलने करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

शेतकरी, व्यापारी आणि नागरिकांकडून सातत्याने तक्रारी येत असल्याने संबंधित अधिकाऱ्यांसोबत दोन ते तीन वेळा बैठका घेऊनही परिस्थितीत सुधारणा झालेली नसल्याचे आवताडे यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघातील शेतकऱ्यांना पूर्ण दाबाने सलग आठ तास वीज, उद्योगांसाठी अखंडित वीजपुरवठा तसेच नागरिकांना सुरळीत सिंगल फेज वीज उपलब्ध करून देण्यासाठी तात्काळ आदेश द्यावेत, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. आमदार आवताडे यांच्या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित विभागाला आवश्यक ती तातडीची कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याने वीज समस्येवर लवकरच दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.